Remembering Aquino and Silvia, two Goans in Mozambique: https://www.gomantaktimes.com/my-goa/art-culture/remembering-aquino-and-silvia-two-goans-in-mozambique

लोकमत

# गोवा विद्यापीठात आकीनू ब्रागांझा यांची जन्मशताब्दी उद्या

लोकमत न्यूज नेटवर्क

**पणजी :** गोवा विद्यापीठ शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य संकाय व इंटरनॅशनल अँड एरिया स्टडीज स्कूलच्या सहकार्याने मोझांबिकमध्ये स्वतःला समर्पित करणाऱ्या आकीनू दी ब्रागांझा आणि सिल्व्हिया ब्रागांझा या दोन उल्लेखनीय गोमंतकीय नागरिकांच्या जीवनाचा गौरव करणार आहे.

सिल्व्हिया या एक कलाकार, चित्रकार आणि कवयित्री होत्या. त्या गोवा, पोर्तुगाल आणि मोझांबिकमध्ये राहिल्या. लिस्बन युनिव्हर्सिटीच्या कला विद्या शाखेतून अध्यापनशास्त्रातील पदवी प्राप्त केल्यानंतर, त्यांनी १९६६ मध्ये लिस्बनमधील सुपीरियर स्कूल ऑफ फाइन आर्ट्समधून चित्रकलेची पदवी पूर्ण केली. पोर्तुगीज आर्टच्या कलेत ओळखल्या गेलेल्या सिल्व्हियाने पोर्तुगाल व मोझांबिकमधील अनेक कार्यशाळांमध्ये भाग घेतला. १९२४ मध्ये गोव्यातील साल्वादोर दु मुंद येथे जन्मलेले आकीनू मोझांबिकमधील एक प्रमुख मुत्सद्दी, प्राध्यापक आणि पत्रकार बनले. १९८६ मध्ये एका विमान अपघातात आकीनूच्या यांचा अकाली मृत्यू झाला.

आकीनूचा मृत्यू दक्षिण आफ्रिकेतील मबुझिनी येथे १९ ऑक्टोबर १९८६ रोजी झाला. यात मोझांबिकच्या स्वातंत्र्यानंतरचे पहिले अध्यक्ष सामोरा माशेल यांचाही मृत्यू झाला. समोरा माशेल आणि नंतर दक्षिण आफ्रिकेचे पहिले अध्यक्ष नेल्सन मंडेला या दोघांच्याही विधवा ग्रासा माशेल यांच्या स्मरणार्थ हा दिवस दरवर्षी स्मरणात ठेवत आकीनूचा वारसा कायम आहे. लिस्बनमधील सामोरा माशेलचे विशेष दूत म्हणून, आकीनू यांनी मोझांबिकच्या स्वातंत्र्याच्या वाटाघाटीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली.

इंग्रजी, फ्रेंच, हिंदी, कोकणी आणि मराठी या पाच भाषांमध्ये अनुवादित सिल्व्हिया ब्रागांझा यांच्या कविता संग्रहाचे प्रकाशन या कार्यक्रमात गोवा विद्यापीठाचे कुलगुरू हरिलाल बी. मेनन यांच्या हस्ते होईल. प्रकाशनानंतर एक पॅनल चर्चा होईल, ज्यामध्ये डॉ. कॉलिन डार्च, मिगुएल ब्रागांझा आणि डॉक्युमेंटरी डायरेक्टर नलिनी एल्व्हिनो डिसोझा व स्कूल ऑफ इंटरनॅशनल अँड एरिया स्टडीजचे डॉ. दत्तेश परुळेकर हे याचे संचालन करतील. 'स्पेशल एन्वॉय' याच्या स्क्रीनिंगने कार्यक्रमाची सांगता होईल.

Goa Main
Page No. 13 Oct 29, 2024
Powered by: erelego.com

# गोंय विद्यापिठांत बुधवारा मनयतले आकीनू दी ब्रागांझा हांची जल्मशती

■ **भांगरभूंय । खबरांमेज**

**पणजी :** बुधवारा, 30 ऑक्टोबराक गोंय विद्यापीठ, शणै गोंयबाब भाशा आनी साहित्य संकाय आनी इंटरनॅशनल अॅण्ड एरिया स्टडीज स्कूल हांच्या सहकार्यान मोझांबिकांत स्वताक समर्पीत केल्लीं आकीनू दी ब्रागांझा आनी सिल्व्हिया ब्रागांझा ह्या गोंयांतल्या दोन नागरिकांचे जिणेचो गौरव करतलें. सिल्व्हिया ही एक कलाकार, चित्रकार आनी कवयित्री आसली. तांचो जल्म 4 ऑक्टोबर 1937 दिसा जालो. तीं गोंय, पोर्तुगाल आनी मोझांबिकांत रावलीं.

1983 वर्सा स्वतंत्र मोझांबिकाच्या पयल्या वर्सांतलें एक मुखेल व्यक्तीमत्व आशिल्ल्या आकीनू दी ब्रागांझा हांचे कडेन तांची भेट जाली. 1924 वर्सा साल्वादोर दा मुंद हांगा जल्मल्ले आकीनू मोझांबिकांतले मुखेल मुत्सद्दी, प्राध्यापक आनी पत्रकार जाले. आकीनूक दक्षीण आफ्रिकेंतल्या मबुझिनी हांगा 19 ऑक्टोबर 1986 दिसा एका विमान अपघातांत मरण आयलें.

लिस्बनांतल्या सामोरा माशेलचे विशेश दूत म्हणून आकीनू हांणी मोझांबिकाच्या स्वातंत्र्याचे वाटाघाटींत म्हत्वाची भुमिका केली. ह्या इतिहासीक भागाचो सोद 'स्पेशल एन्वॉय' ह्या म्हायतीपटांत केला. जो कार्यावळीचो एक वांटो म्हणून गोंय विद्यापीठांत दाखयतले.

हे कार्यावळींत इंग्लीश, फ्रेंच, हिंदी, कोंकणी आनी मराठी ह्या पांच भाशांनी अनुवादीत जाल्ल्या सिल्व्हिया ब्रागांझा हांच्या कविता झेल्याचें लोकार्पण गोंय विद्यापीठाचे कुलगुरू प्रोफेसर हरिलाल बी. मेनन हांचे हस्तुकीं जातलें. लोकार्पण सुवाळ्या उपरांत एक पॅनल चर्चा जातली. जातूंत डॉ. कॉलिन डार्च, मिगुएल ब्रागांझा आनी डॉक्युमेंटरी डायरेक्टर नलिनी एल्व्हिनो डिसोझा आनी स्कूल ऑफ इंटरनॅशनल अॅण्ड एरिया स्टडीजाचे डॉ. दत्तेश परुळेकार हे सहभागी जातले. 'स्पेशल एन्वॉय' च्या स्क्रीनिंगान कार्यावळीची सांगता जातली.

# गोवा विद्यापीठात आकीनू दी ब्रागांझा यांची उद्या जन्मशताब्दी

**गोवन वार्ता । पणजी :** गोवा विद्यापीठ शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य विभागातर्फे इंटरनॅशनल अँड एरिया स्टडीज स्कूलच्या सहकार्याने ३० रोजी मोझांबिकमध्ये स्वत:ला समर्पित करणाऱ्या आकीनू दी ब्रागांझा आणि सिल्व्हिया ब्रागांझा या दोन उल्लेखनीय गोव्यातील नागरिकांच्या जीवनचरित्राला उजाळा देण्यात येणार आहे. इंग्रजी, फ्रेंच, हिंदी, कोकणी आणि मराठी या पाच भाषांमध्ये अनूदित सिल्व्हिया ब्रागांझा यांच्या कविता संग्रहाचे प्रकाशन या कार्यक्रमात गोवा विद्यापीठाचे कुलगुरू मा. सीनियर प्रोफेसर हरिलाल बी. मेनन यांच्या हस्ते होणार.